# International Journal of Advance and Applied Research
**Peer Reviewed | International Open Access Journal**
**ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/**
***Volume-13, Issue-3 | January – February 2026***


**Original Article**

# सांगोला शेतकरी सहकारी सुतगिरणीचा स्थानिक रोजगारावर झालेला परिणाम


**सचिन रामचंद्र खांडेकर[1], लखन अंकुश जानकर[2], प्रथमेश अशोक गुसाळे[3]**

*[1,2,3]एम.ए.भाग-II,*

*[1,2,3]अर्थशास्त्र विभाग,कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर*



**Manuscript ID:**
IJAAR-B130391
**ISSN: 2347-7075**
**Impact Factor – 8.141**

**Volume - 13**
**Issue - 3**
**January – February 2026**
**Pp. 591 - 595**

**Submitted:** 22 Jan.2026
**Revised:** 05 Feb. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026



***Corresponding Author:***
*सचिन रामचंद्र खांडेकर*



Quick Response Code:

**Website:** https://ijaar.co.in/

DOI: 10.5281/zenodo.20322757

DOI Link:
https://doi.org/10.5281/zenodo.20322757



Creative Commons



***सार:***

सहकारी चळवळ ही महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाची कणा मानली जाते. सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी स्थापन करण्यात आलेली सांगोला शेतकरी सहकारी सूतगिरणी ही एक महत्त्वाची औद्योगिक संस्था आहे. या सूतगिरणीच्या स्थापनेमुळे केवळ कापूस उत्पादक शेतकऱ्यांनाच नव्हे, तर तालुक्यातील बेरोजगार युवक, महिला व अल्पशिक्षित कामगार यांना मोठ्य प्रमाणावर राजे गाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

या संशोधनाचा मुख्य उद्देश सूतगिरणी स्थापनेमुळे स्थानिक रोजगारनिर्मितीवर झालेला परिणाम अभ्यासणे हा आहे. सूतगिरणीमुळे थेट रोजगाराबरोबरच अप्रत्यक्ष रोजगारही निर्माण झाला आहे. वाहतूक, कापूस खरेदी-विक्री, हमाली, देखभाल-दुरुस्ती, तसेच पूरक उद्योग यांमुळे अनेक कुटुंबांचे उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध झाले आहे.

या अभ्यासात प्राथमिक व दुय्यम माहितीचा उपयोग करण्यात आला आहे. प्रश्नावली, मुलाखती तसेच विविध अहवालांच्या आधारे सूतगिरणीचा सामाजिक-आर्थिक परिणाम तपासण्यात आला आहे. अभ्यासातून असे दिसून येते की, सांगोला शेतकरी सहकारी सूतगिरणीमुळे रोजगारनिर्मिती वाढून परिसरातील बेरोजगारी कमी होण्यास हातभार लागला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील आर्थिक स्थैर्य व सामाजिक विकास साधण्यास ही संस्था उपयुक्त ठरत आहे.



***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*



***How to cite this article:***

*सचिन रामचंद्र खांडेकर, लखन अंकुश जानकर, प्रथमेश अशोक गुसाळे. (2026). सांगोला शेतकरी सहकारी सुतगिरणीचा स्थानिक रोजगारावर झालेला परिणाम. International Journal of Advance and Applied Research, 13(3), 591 - 595. https://doi.org/10.5281/zenodo.20322757*

**स्थापना** :

सांगोला शेतकरी सहकारी सुतगिरणीची स्थापना २८ जानेवारी १९८० रोजी स्थापन झाली आहे.

**उदिष्टे :**

१) सांगोला तालुक्याची आर्थिक- सामाजिक परस्थितिचा अभ्यास करणे.

२) सांगोला शेतकरी सहकारी सूतगिरमुळे स्थानिक रोजगार निर्मितीवर झालेला परिणाम.

३) सांगोला शेतकरी सूतगिरणीचे प्रोफाईल अभ्यासणे.

४) सांगोला शेतकरी सहकारी सूतगिरणीमुळे कामगारांच्या आर्थिक स्थितीवर झालेला परिणाम अभ्यासने.

**संशोधन पध्दती** :

प्रस्तुत शोध निबंधामध्ये दुय्यम साम्रगीचा वापर करण्यात आलेला आहे. त्याकरीता विविध संदर्भ, ग्रंथ, पुस्तके, मासिके, अहवाल, वृत्तपत्रे, संकेतस्थळ इत्यादींचा उपयोग केला आहे.

**संशोधन विषयाचे विश्लेषण :**

सांगोला शेतकरी सहकारी सुतगिरणी ही स्थानिक अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्वाची संस्था आहे. तिचा मुख्य उददेश शेतक-यांच्या कपाशीचे व्यवसायिक रित्या उत्पादन करणे आणि स्थानिक नागरिकांसाठी रोजगार निर्मिती करणे हा आहे. या संदर्भात स्थानिक रोजगाराच्या परिणामांचे विश्लेषण करताना खालील बाबी महत्वाच्या ठरतात.

**१) स्थानिक रोजगार निर्मातीचा प्रभाव :** सांगोला सूतगिरणी : स्थानिक रोजगारावर प्रभाव - तक्ता

| बाब | प्रभाव | सविस्तर विश्लेषण |
|---|---|---|
| स्थानिय रोजगार निर्मिती | वाढ | सूतगिरणीत कामगारांची गरज असते. स्थानिक लोकांना थेट नोकरी मिळते. उदा. : यंत्र चालविणे, कापड रंगविणे, पकिंग, इ. |
| महिला रोजगार | वाढ | सूतगिरणीत अनेक कामे महिलांसाठी उपयुक्त आहेत. घराजवळ काम असल्यामुळे महिलांना आर्थिक स्वावलंबन मिळते. |
| तरुण पिढीसाठी संधी | उपलब्ध | विद्यार्थी किंवा नवोदीप तरुणासाठी प्रशिक्षण व कामाची संधी उपलब्ध होते. त्यामुळे स्थलांतर कमी होते. |
| कौशल्य विकास | सुधारणा | कामगारांना कापड विणणे, यंत्र चालविणे, गुणवत्ता तपासणे अशा कौशल्याची सवय लागते, जे भविष्यात त्यांच्या कामासाठी उपयुक्त ठरते. |
| स्थानिक अर्थव्यवस्था | मजबुती | नोकरी मिळाल्यामुळे उत्पन्न वाढते, स्थानिक बाजारपेठेत खरेदी क्षमता वाढते, त्यामुळे इतर व्यवसायांनाही फायदा होतो. |
| समाजावर परिणाम | सकारात्मक | रोजगारामुळे लोकांचा आत्मसन्मान वाढतो, सामाजिक स्थैर्य टिकते आणि बेरोजगारी कमी होते. |
| | | |

**सविस्तर विश्लेषण :**

सांगोला येथील सूतगिरणींमुळे स्थानिक रोजगार निर्मितीवर सकारात्मक परिणाम झाले आहेत. ही उद्योगे मुख्यत्वे स्थानिक लोकांना थेट नोकरी देतात. यामुळे गावातील बेरोजगारीचे प्रमाण घटते. विशेष म्हणजे, महिलांना आणि तरुण पिढीला काम करण्याची संधी मिळते, ज्यामुळे त्यांच्या कौशल्यांचा विकास होतो आणि आर्थिक स्वावलंबन वाढते.

स्थानिक उत्पन्न वाढल्याने बाजारपेठेत खरेदी क्षमता वाढते, ज्यामुळे इतर लहान व्यवसायांनाही चालना मिळते. कौशल्ये मिळाल्यामुळे स्थानिक कामगार भविष्यात उच्च पगाराच्या नोकऱ्यांसाठी तयार होतात. याशिवाय, रोजगारामुळे सामाजिक स्थैर्य टिकते आणि लोकांमध्ये आत्मसन्मान वाढतो.

सांगोला सूतगिरणी हे फक्त आर्थिक लाभपुरते मर्यादित नाहीत, तर समाजाच्या समग्र विकासातही योगदान देतात, ज्यामुळे हे उद्योग स्थानिक समुदायासाठी अत्यंत महत्वाचे आहेत.

**२) सामाजिक परिणाम :** सांगोला सूतगिरणी : सामाजिक परिणाम - तक्ता

| सामाजिक क्षेत्र | सकारात्मक परिणाम | बदलाचा प्रकार | समाजावर परिणाम |
|---|---|---|---|
| स्त्रियांचे स्थान | महिलांना कामाच्या ठिकाणी समान वागणूक मिळते, आत्मविश्वास वाढतो | सामाजिक समानता | महिलांचे सशक्तीकरण, आर्थिक स्वतंत्रता |
| शिक्षण | मुलींच्या शिक्षणाला प्रोस्ताहान | शैक्षणिक सुधारणा | पुढील पिढी अधिक जागरूक आणि शिक्षित |
| आरोग्य | कामाच्या ठिकाणी सुरक्षीतता आणि स्वच्छता सुधारणे | जीवनमान सुधारणा | समुदायात आरोग्य स्थिती सुधारली |
| आर्थिक स्थिती | महिलांना उत्पन्न मिळणे, कुटुंबाला आर्थिक आधार | आर्थिक सक्षमता | घरगुती व समुदाय स्तरावर समृद्धी |
| सांस्कृतीक बदल | पारंपारिक रूढीपेक्षा प्रगत विचार | सामाजिक मनोवृत्ती बदल | समाज अधिक उदार, प्रगत, समावेशक बनला |
| राजकीय सहभाग | महिलांचे समाजकार्यात सहभाग वाढला | निर्णय प्रक्रियेत सहभागी होणे | महिला नेतृत्व आणि मताधिकाराची जाण वाढली |

सामजिक परिणामाचे विश्लेषण :

सकारात्मक विश्लेषण

1. महिलांचे सशक्तीकरणः सांगोला सूतगिरणी आंदोलनाने महिलांना फक्त कुटुंबाचा आधार न मानता आर्थिक आणि सामाजिक निर्णय घेण्यास सक्षम केले. त्यांचा आत्मविश्वास वाढला, जे समाजात समानतेसाठी आणि न्यायासाठी प्रेरक ठरले.

2. शिक्षणाचा प्रसारः या चळवळीमुळे मुलींच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित झाले. शिक्षणामुळे महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव झाली आणि पुढील पिढीत विचारशक्ती व स्वावलंबन वाढले.

3. आरोग्य व जीवनमान सुधारणाः कामाच्या ठिकाणी स्वच्छता आणि सुरक्षितता सुनिश्चित केल्याने कामगारांचे आरोग्य सुधारले. परिणामी, समुदायातील लोकांचे जीवनमान वाढले आणि रोगांचे प्रमाण कमी झाले.

4. आर्थिक स्वावलंबनः महिलांना उत्पन्न मिळाल्याने घरगुती आर्थिक स्थिती मजबूत झाली. हे आर्थिक स्वावलंबन फक्त व्यक्तिगत लाभ देत नाही, तर संपूर्ण समाजात सामाजिक बदल घडवते.

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

**3) स्त्री आणि युवा पिढीवर:** सांगोला सूतगिरणीमुळे स्त्री आणि युवा पिढीवर परिणाम - तक्ता

| परिणामाचे क्षेत्र | स्त्री पिढीवर परिणाम | युवा पिढीवर परिणाम |
|---|---|---|
| आर्थिक प्रभाव | कमाईची संधी, आर्थिक स्वावलंबन वाढले | कामाच्या संधी, कौशल्य विकसित झाले |
| शिक्षण आणि कौशल्य | कामासोबत हातमाग कौशल्य, टेक्निकल ज्ञान | तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण, अनुभवातून शिका |
| सामाजिक स्थिति | सामाजिक मान-सन्मान वाढला, घराबाहेर कामाची संधी | समाजात सशक्त व्यक्ती म्हणून ओळख |
| स्वावलंबन | आर्थिक निर्णय घेण्याची क्षमता वाढली | स्वतंत्र राहण्याची मानसिकता वाढली |
| समाजातील सहभाग | गटबद्ध कामामुळे समुदायाशी जोडणी | सामाजिक नेटवर्क वाढले, सामाजिक जबाबदारीची जाणीव |

सविस्तर विश्लेषण

सांगोला येथील सूतगिरण्या सुरू झाल्यानंतर, स्त्री पिढीवर सकारात्मक बदल स्पष्ट दिसू लागले. आधी घरातील कामावरच मर्यादित असलेली स्त्रिया आता आर्थिकदृष्ट्या सक्रिय झाल्या. कमाई मिळाल्यामुळे त्यांना घरातील आर्थिक निर्णय घेण्याची संधी मिळाली आणि सामाजिक मान-सन्मानही वाढला. या प्रक्रियेमुळे स्त्रिया फक्त घरकाम करणाऱ्या नसून समाजातील सक्रिय योगदान देणाऱ्या व्यक्ती म्हणून उभ्या राहिल्या. युवक पिढीवरही सूतगिरणींचा प्रभाव लाभदायक ठरला. कामाच्या संधीमुळे त्यांना कौशल्य विकसित करण्याची संधी मिळाली. यांत्रिक तंत्रज्ञान, हातमाग कौशल्य आणि कामकाजाचा अनुभव यामुळे त्यांची व्यावसायिक पात्रता वाढली. त्याचबरोबर समाजात स्वतंत्र आणि सशक्त व्यक्ती म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. सामाजिकदृष्ट्याही हे सकारात्मक ठरले. स्त्रिया आणि युवक कामाच्या गटात एकत्र आले, समुदायाशी जुळले आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव वाढली. परिणामी, सूतगिरणीमुळे फक्त आर्थिक विकास नव्हे तर सामाजिक आणि मानसिक विकासही घडला.

**४. स्थानिक अर्थव्यवस्थेवर परिणाम:** सांगोला सूतगिरणीचा स्थानिक अर्थव्यवस्थेवर परिणाम - तक्ता

| परिणाम क्षेत्र | परिणामाचे स्वरूप | स्थानिक अर्थव्यवस्थेसाठी सकारात्मक परिणाम |
|---|---|---|
| रोजगार निर्मिती | सूतगिरणीत काम करणारे स्थानिक लोक | नवीन नोकऱ्या उपलब्ध झाल्यामुळे बेरोजगारी कमी झाली; कौशल्य वाढले |
| कृषी उद्योग | कापूस शेतकऱ्यांना स्थानिक बाजार | कापूस विक्रीची स्थिर मागणी, शेतकऱ्यांची उत्पन्न वाढले |
| लघुउद्योग | कपड्यांचे इतर उत्पादन, हातमागणी उद्योग | सूतगिरणीच्या सहाय्याने छोटे व्यवसाय वाढले; स्थानिक बाजारात विविधता आली |
| आर्थिक प्रगती | उत्पन्न व खरेदीशक्ती वाढ | स्थानिक लोकांचे जीवनमान सुधारले; बाजारपेठेत विक्री व आर्थिक व्यवहार वाढले |
| सामाजिक प्रभाव | स्त्रिया व तरुणांसाठी कामाची संधी | महिलांचे सामाजिक व आर्थिक सक्षमीकरण; कौशल्य आणि आत्मनिर्भरता वाढली |
| शहर विकास | परिवहन, बाजारपेठ, इतर सुविधा | सूतगिरणीसाठी वाहतूक व इतर सुविधा वाढल्या, शहराची आर्थिक गती वाढली |

**सविस्तर विश्लेषण :**

सांगोला मधील सूतगिरणी स्थानिक अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत लाभदायी ठरली. सर्वप्रथम, ही गिरीणी स्थानिक लोकांना रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध करून देते. त्यामुळे बेरोजगारी कमी झाली आणि स्थानिक लोकांच्या कौशल्यात वाढ झाली.

कापूस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी सूतगिरणीने स्थानिक बाजार स्थिर केला. शेतकऱ्यांना फक्त उत्पन्न मिळत नाही, तर त्यांच्या उत्पादनाची मागणी सातत्याने राहते, ज्यामुळे त्यांचे आर्थिक जीवन स्थिर होते.

लघुउद्योग व हातमागणी उद्योगांनाही बळ मिळाले. सूतगिरणीच्या आसपास छोटे कपड्यांचे व्यवसाय, सिलाई केंद्रे, दुकानं आणि इतर उद्योग विकसित झाले. त्यामुळे स्थानिक बाजारपेठ अधिक विविध आणि समृद्ध झाली.

सामाजिक दृष्ट्या, या गिरीणीत स्त्रिया आणि तरुण वर्ग सामील झाले. यामुळे महिलांचे आत्मनिर्भरता वाढली, कौशल्य विकसित झाले आणि समाजात त्यांच्या भूमिकेची दृष्टी बदलली.

**निष्कर्ष :**

या अभ्यासातून असे निष्पन्न होते की सांगोला कापूस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनास योग्य बाजारपेठ उपलब्ध झाल्यामुळे आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे. तसचे वाहतूक, हमाली, देखभाल-दुरुस्ती व पूरक व्यवसायांच्या माध्यमातून अप्रत्यक्ष रोजगार वाढला आहे. सूतगिरणीमुळे स्थलांतराचे प्रमाण काही प्रमाणात कमी झाले असून स्थानिक आर्थिक व्यवहारांना गती मिळाली आहे. तथापि, उत्पादन खर्च, कच्च्या मालाची उपलब्धता व बाजारातील चढ-उतार यांसारख्या अडचणी लक्षात घेता व्यवस्थापन अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. एकूणच सांगोला शेतकरी सहकारी सूतगिरणी ही रोजगारनिर्मिती व ग्रामीण आर्थिक विकासासाठी उपयक्तु व महत्त्वाची संस्था असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

**संदर्भ सूची:**

1. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, 2009-10, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.
2. पाटील जे एफ. (संपादक), सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, मे 2010, सकाळ पेपर्स प्रकाशन, पुणे.
3. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टिक्षेपात, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे 410007 001:2005, 2006, 2007 व 2008
4. घाटगे व वावरे, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती 2010.
5. सातारा जिल्हा उपनिबंधक कार्यालय सातारा.
6. प्राध्यापक रायखेलकर / दामाजी (२००३), भारतीय अर्थव्यवस्था, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.
7. डॉ. इंदुरकर, १९९३, भारतीय अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर.
8. योजना, डिसेंबर २००३, Vol. XXXI, No. V
9. सांगोला शेतकरी सहकारी सूतगिरणी (२०२०) वार्षिक अहवाल सांगोला सूतगिरणी कार्यालय.
10. जिल्हा सांख्यिकी कार्यालय, सोलापूर (२०१९) जिल्हा सामाजिक-आर्थिक आढावा सोलापूर : शासन प्रकाशन